ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 9 | MAY - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# त्यागमूर्ती लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या कार्यातील समभाव



प्रा. डॉ. दिगंबर शिवाजी वाघमारे
विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय टेंभूर्णी.

## प्रस्तावना:

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये अनेक कर्तृत्ववान स्त्रिया होऊन गेल्या आहेत.त्यांच्या विचार व कार्यामुळे भारतामध्ये उच्च आदर्श निर्माण होऊन भारताची जडणघडण झाली आहे,त्यामध्ये लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक योगदान महत्वाचे ठरते.कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरु केलेल्या ज्ञानप्रसार आणि नवसमाज निर्मिती कार्यामध्ये लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचा सहभाग अतिशय महत्वपूर्ण आहे.सामान्य शेतकरी, कष्टकरी,दलित यांच्या शिक्षणसाठी लक्ष्मीबाई यांनी केलेला त्याग लक्षात घेण्यासारखा आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सत्यशोधक समाजाचा वारसा आतिशय सशक्तपने चालविला.महात्मा फुले यांना अभिप्रेत असणारे बहुजनांचे शिक्षण या कार्यास त्यांनी त्यांचे आयुष्य वाहिले होते. कर्मवीरांनी शिंक्षण हे समाजपरिवर्तनाचे माध्यम मानले.त्यांचा जातिभेदास विरोध होता.त्यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेमध्ये व वस्तीगृहात कसलाही जातीभेद मनाला जात नव्हता.त्यांच्या या मानवतावादी,सामाजिक समतावादी भूमिकेस त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांनी मनोमन साथ दिली.विविध प्रसंगी त्या अतिशय खंबीरपणे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सोबत उभ्या राहिल्या.कर्मवीरांनी सुरु केलेल्या शिक्षणप्रसाराच्या कार्यामध्ये अनेक हालअपेष्ठा सहन कराव्या लागल्या तरी त्यांनी त्याची तक्रार केली नाही. लक्ष्मीबाई यांनी स्वतःचे सर्व दागिने देऊन हे शिंक्षणप्रसाराचे कार्य अविरत सुरु ठेवण्यासाठी अनेक सुखांचा त्याग केला.त्यांच्यावर झालेले पुर्व संस्कार बाजूला ठेऊन आधुनिक विचारांचा स्वीकार केला. जातीभेदाच्या, अस्पृश्यतेच्या जाचक काळात त्यांनी जातीभेद मानला नाही,अस्पृश्यांना आपलेसे केले.त्यांनी केलेल्या अनेक कृती प्रचलित प्रथा-परंपरा नाकारणाऱ्या होत्या.लक्ष्मीबाई यांनी केलेल्या कार्याविषयी माहिती पुढे आणणे हा शोधनिबंधाचा उद्देश आहे.

## वसतिगृहातील विद्यार्थी हे स्वतःची मुले मानली :

कर्मवीर भाऊराव पाटील नामदार भास्करराव जाधव यांना पाठविलेल्या २३मे,१९४१ च्या पत्रात लिहितात, या कमी स्वतःची किती जरी इच्छा होती तरी रुधीखाली दडपलेल्या माझ्या पत्नीचा पहिल्यांदा विरोध झाला: परंतु थोडक्याच अवधीत माझ्या या कार्याची माझ्या प्रिय पत्नीस महती पटून मला अडथळा तर आला

नाही;परंतु प्रोत्साहन मिळत गेले.[१] लक्ष्मीबाई जैन धर्मात वाढल्याने त्यांचे सोवळे,ओवळे फारच कडक असे.जाती धर्माची शिकवण त्यांच्या अंगात भिनल्याने जात पात न पाळणे म्हणजे त्यांना अधर्म वाटे.रूढी म्हणजे धर्म असे त्यांना वाटे.याउलट आण्णांचा स्वभाव त्यांचे आचार विचार आधुनिक व पुढारलेले.सातारला आण्णांनी संस्थेचे कार्य सुरु केल्यावर लक्ष्मीबाईंची फार अडचण व्हायची पण नंतर त्यांच्या विचारात झपाट्याने बदल झाला.[२] कर्मवीर लक्ष्मीबाई यांना आण्णांसोबत काम करतांना त्याकाळातील जातीभेद, अस्पृश्याता यांची निरर्थकता लक्षात आली.यामुळे त्यांच्या मध्ये आमूलाग्र बद्दल घडून आला.त्यांनी त्यांचे पूर्ण आयुष्य या कार्यासाठी वाहिले.पतीच्या अंगीकृत कार्यात सहभागी होताना,त्यांनी स्वतःचा कसलाही विचार न करता जसी सावली माणसाबरोबर फिरते,त्याचप्रमाणे पतीच्या कार्याशी त्या एकरूप झाल्या आण्णांच्या पाठीशी उभ्या राहिल्या,अण्णांनाच्या कार्यात त्या इतक्या एकरूप झाल्या की,वसतिगृहाची मुले ही स्वतःची मुले आहेत असेच त्यांचे मत बनले.[३] वसतिगृहातील एखाद्या विद्यार्थ्याला घरची आठवण झाली की तो विद्यार्थी खिन्न होऊन बसलेला असे,लक्ष्मीबाईच्या हे लक्षात येत असे.त्या मुलाच्या पाठीवरून हात फिरवत त्याला घरातील खाऊ देत वसतिगृहातील प्रत्येक विद्यार्थ्याला आईची माया देण्याचे काम लक्ष्मीबाई करीत.वसतिगृहातील पाहुण्यांनी,सहज घरची चौकशी करण्याच्या उद्देशाने लक्ष्मीबाईना विचारले तुम्हाला किती मुले आहेत लक्ष्मीबाई सांगत साठ,सत्तर मुले आहेत. याच्यात यांची वसतिगृहाशी एकरूपता कळते.[४] लक्ष्मीबाई यांनी शिक्षणकार्य हे आपले कार्य आहे असे मानले.त्यांची ही मानवतावादी भूमिका,कृतिशीलता अधिक महत्वाची वाटते.

## सहभोजन :

शिक्षणाची संधी मिळवून देऊन आर्थिक व सामाजिक प्रगतीचा मार्ग मोकळा करून देणे हे देखील एक मोठे कार्य आहे.परंतु कर्मवीरांनी आपली दृष्टी तेवढीच मर्यादीत असी कधीच ठेवली नाही.समाज परिवर्तनाची,सामाजिक समतेची दृष्टी आपल्या विद्यार्थांना मिळावी यासाठी त्यांनी त्यांच्या वसतिगृहातून सर्व धर्माच्या सर्व जातीच्या विद्यार्थाना सरमिसळ राहावयाची आपल्या हाताने परंतु एकत्र भोजन करावयाची ए एकत्र एका पंक्तीत जेवण घेण्याची सवय लावली.[५] निधर्मी तत्वाने अठरापगड जातीतले लोक एकत्र राहतात.स्वतः स्वयंपाक करून एकत्र जेवतात हीच त्या काळी आचब्याची गोष्ट होती.आण्णा स्वतः पहाटे विद्यार्थीनां उठवून अभ्यास करायला लावीत आपला विद्यार्थी सर्व क्षेत्रात पुढे आला पाहिजे यावर आण्णांचा कटाक्ष, खेळ, व्यायाम यांचाही पाठपुरावा करीत. स्पृश्य-अस्पृश्यता,जातीभेद नष्ट करावयाचे असतील तर रोटी-बेटी व्यवहार हा त्यावरला एकमेव रामबाण उपाय आहे.रोटी-बेटी व्यवहाराने दोन भिन्न कुटुंबातील स्नेहबंधाने दृढ होतात.ती अधिक जवळ येतात खाली तळपायाला काटा टोचला तर डोळ्यात टचकन पाणी उभे राहते.असले रक्ताचे नाते निर्माण होते.आणि खाल्ल्या मिठाला आठवण राहते.भाऊरावांच्या वसतिगृहात राहून सहजीवन जगणाऱ्या आणि सहशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थाच्या दृष्टीने तर सहभोजन ही नित्याची दैनंदिन बाब होती. कर्मवीर आण्णाच्या या जातीभेद विरोधी भूमिकांना समजून घेऊन लक्ष्मीबाई यांनी साथ दिली.शंकरराव खरात पुण्याच्या या वसतिगृहातील विद्यार्थी होते.ते आपल्या 'तराळ-अंतराळ'या आत्मचरित्रात सांगतात,'या आमच्या वसतिगृहात महार,मराठा,न्हावी,धनगर,कोष्टी,मुसलमान असे विविध जातीधर्माचे विद्यार्थी एकदिलाने,एकत्र जीवन जगत होते.आम्ही एकाच कुटुंबातील माणसाप्रमाणे एकत्र जीवन जगत होतो.माझ्या तरी या बोर्डिंगचा तसाच अनुभव होता.आम्ही सर्वजण जातपात विसरलो होतो. एका ताटात बसून आम्ही जेवत होतो.एकाच्या तळहातातील भाकरी आम्ही एक एक तुकडा मोडून खात होत.या बोर्डिंगात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी

जातपात नष्ट करणारी,अस्पृश्यता नष्ट करणारी खरी मुलभूत क्रांतीच घडवून आणली होती,असे मला वाटत असे.याच क्रांतीची वाटचाल,याच दिशेने पुढे चालली असती तर आज आपल्या देशाचे वेगळेच चित्र दिसले असते.[६] खऱ्या अर्थाने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी या देशाचे भवितव्य निश्चित केले होते. त्याच्या प्रत्येक विचारला व कार्याला लक्ष्मीबाई यांची मनोमन साथ होती.

## त्यागमूर्ती लक्ष्मीबाई :

बोर्डींगमध्ये गरीब हुशार मुले असत भाऊराव सातारा भागांतून हुशार मुले गोळा करीत बरेच विद्यार्थी नादार-अर्धनादार असत बाकी खर्च भाऊराव स्वतःच करीत.या कार्याला लक्ष्मीबाईची मोठी मिळून मिसळून मदत होई.विद्यार्थ्यामध्ये कौटुंबिक जिव्हाळा निर्माण होई.सर्व जातीची मुले एकत्र राहत,एकत्र जेवत,एकत्र काम करीत.सर्व मुलांच्या लक्ष्मीबाई वाहिनी झाल्या.लक्ष्मीबाईनी सोवळे ओवळे सोडून दिले.शिवाशिवीची काहींच भानगड राहिली नाही.स्वतःच्या खाजगी संसाराकडे लक्ष न देता बोर्डींगचाच संसार आपला असे लक्ष्मीबाई काम पाहू लागल्या [७] विद्यार्थ्यांची किरकोळ भांडणे त्या मिटवीत, भाऊराव नसले व काही आर्थिक अडचण आल्यास लक्ष्मीबाई स्वतःचे दागिने गहाण ठेऊन अगर मोडून खर्च भागवीत.कारण गहाण दागिने सोडवून घेता येत नसत.शेवटी संस्थेसाठी हे स्त्रीधन खर्च होई.भाऊरावांच्या मनात लक्ष्मीबाईच्या या त्यागाचा,सेवेचा फार आनंद होई.माउलीचा गौरव करींत दागिन्याचा व्यवहार श्री.बा.न.भद्रे वकिलामार्फत करीत.त्यांना लेखक श्री.मा.भि. काटकर एकदा भेटले. तर भद्रे वकील म्हणाले, सौ.लक्ष्मीबाईची माहेरची परीस्थिती चांगली आहे.त्यामुळे त्यांच्या अंगावर माहेराहून १०० -१५० तोळे सोने आले होते.कदाचित यापेक्षाही जास्तच असावे.सार्वजनिक कार्यासाठी त्यांनी ते खर्च केले.[८] वसतिगृहातील खर्च भागविण्यासाठी भाऊराव रोख आणि धन्यरूपाने देणग्या मिळवण्याचा प्रयत्न करत असत.पण सुरवातीच्या काळात फारशा देणग्या मिळत नव्हत्या.त्यानांच वसतिगृहाचा सर्व खर्च करावा लागला.सौ.लक्ष्मीबाईना माहेराहून बरेचसे सोन्याचे दागिने मिळाले होते.ते सर्व दागिने विकून भाऊरावांनी वसतिगृहाचा खर्च भागविला.[९] भाऊराव बाहेरगावी गेले होते.वसतिगृहातील धान्य संपले होते.मुले उपाशी होती.सर्व दागिने विकले होते.फक्त मंगळसूत्रच तेवढे राहिले होते.ते मंगळसूत्र विकून त्यांनी वसतिगृहासाठी धान्य आणले.आपल्या वैयक्तिक संसाराची भाऊराव व लक्ष्मीबाई यांनी कधीच काळजी केली नाही.[१०] नेहमी आपल्या पत्नीशी म्हणजे लक्ष्मीबाईशी चढ्या आवाजात बोलणारया भाऊरावाचा आवाज अशा वेळी खूप मृदू होत असे.याविषयी खुद्द भाऊराव सांगतात,'मी जेव्हा अडचणीत असावयाचा तेव्हा बायकोशी चार गोड शब्द बोलून तिच्याकडे दागिन्यांची मागणी करावयाचा.तिच्या अंगावरचा एक एक दागिना ती मला देऊ लागली.[११] त्यामुळे साक्षात लक्ष्मी असणारी ही रयतेची माऊली थोड्याच दिवसात लंकेची पार्वती बनून गेली लक्ष्मीबाई यांच्या कार्याकडे पाहताना त्यांची समाजातील असणारे अज्ञान,मागासलेपण याबाबतील त्यांची दृष्टी ही बदलाची होती.त्यागी वृतीने त्यांनी अनेक दुखं स्वीकारलेली दिसतात.कर्मवीर भाऊराव पाटील याच्या शिक्षणप्रसार कार्यामुळे त्यांना अनेक सुखाचा त्याग करून आतिशय दारिद्र्याचे जीवन जगावे लागले.तरीही त्या समाजसुधारणा कार्याने इतक्या प्रभावित झाल्या होत्या की हेच आपले जीवन ध्येय आहे.असे त्यांनी मनोमन स्वीकारे होते.भारतीय इतिहासात त्यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय आहे.

## संदर्भ साधने :

1) जाधव रमेश,कर्मवीर भाऊराव पाटील,साकेत प्रकाशन,औरंगाबाद,पृ.१५१
2) ढगे सुभाष,कर्मवीर भाऊराव पाटील कार्य आणि विचार,विजय प्रकाशन,कोडोली पृ.७३

3) तत्रैव पृ.७४
4) जाधव रमेश,कर्मवीर भाऊराव पाटील,साकेत प्रकाशन,औरंगाबाद,पृ.९८
5) तत्रैव पृ.९९
6) तत्रैव पृ.१८२
7) लांडगे मनोहर (संपादक) रयतेची लक्ष्मी,ललितराज प्रकाशन,अहमदनगर २०१४ पृ.१२
8) तत्रैव पृ.१३
9) लांडगे मनोहर (संपादक) रयतेचे कर्मवीर, ललितराज प्रकाशन,अहमदनगर २०१८ पृ.६५
10) तत्रैव पृ.६५
11) जाधव रमेश,कर्मवीर भाऊराव पाटील,साकेत प्रकाशन,औरंगाबाद,पृ.१५०